# पायाच्या फुगलेल्या शिरा अर्थात व्हेरीकोज व्हेन्स

**डॉ. उध्दव पाटील**
कॉस्मेटिक व लेसर सर्जन
**९४ २२९५ २२९५**

टच्च फुगलेल्या, वेडयावाकडया आणि नागमोडी अशुद्ध रक्तवाहिन्या किंवा शिरांना व्हेरीकोज व्हेन्स म्हणतात. शिरांचे जन्मजात व्यंग असल्यास, शिरांतून रक्तप्रवाह पुढे जाण्यास प्रतिबंध झाल्यास किंवा शिरांतून रक्त प्रवाह उलटया दिशेने वाहू लागल्यास व्हेरीकोज व्हेन्स तयार होतात. शीरांतील जन्मजात व्यंग दोषांमुळे शरीराच्या एखादया भागाचा रक्तपुरवठा वाढतो आणि त्या भागाची वाढ इतर भागांपेक्षा भरभर होते त्यामुळे तो भाग जाड किंवा लांब होतो. यालाच लोकल जायगॅन्टीझम म्हणतात. गर्भाशयाच्या दाबामुळे ओटीपोटातील शिरांवर दाब पडल्याने पायांच्या शिरा फुगतात हे ब-याच स्त्रीयांनी गरोदरपणात अनुभवले आहे. बाळंतपणानंतर दाबाचे कारण नाहीसे झाल्याने त्या पूर्ववत लहान होतात. परंतु त्या जर फारच फु गल्या गेल्या तर त्यातील नाजुक झडपा ताणल्या गेल्याने फाटतात आणि व्हेरीकोज व्हेन्सची सुरूवात होते. पाय सोडून शरीराच्या इतर भागावर व्हेरीकोज व्हेन्स दिसण्याचे प्रमाण अत्यल्प आहे आणि असे लहान वयात आणि तरूणपणांत आढळल्यास त्यामागे शीरांतील जन्मजात दोष हेच प्रमुख कारण असू शकते. उतारवयात मात्र पाय सोडून शरीराच्या इतर भागावरील शीरा फुगलेल्या दिसू लागल्यास त्यामागे एखादी टयूमरची गाठ आणि तिही कॅन्सरची नाही ना याची खातरजमा करून घेणे महत्वाचे ठरते.

अल्ट्रासाऊंड तंत्रातील कलर, डुप्लेक्स, ट्रिप्लेक्स आणि पॉवर डॉप्लर या अत्याधुनिक तंत्रांच्या मशीन्सने रक्तवाहिन्यांचा सखोल अभ्यास करता येतो. प्रमाणापेक्षा मोठया झालेल्या शीरा, त्यांत उलटया दिशेने फिरलेला रक्तप्रवाह, त्यातील खराब झालेल्या झडपा आणि डीप व्हेन्स मधून रक्त उलटे त्वचेखालील शीरांत आणणारे परफोरेटर्स तसेच डीप व्हेन्स मध्ये रक्तगुठळया झालेल्या नाहीत ना या सर्व गोष्टींची माहिती या एका तपासणीमुळे मिळते आणि त्या अनुषंगाने पुढील उपचाराची दिशा ठरविण्यास मोलाची मदत होते.

व्हेरीकोज व्हेन्स हा जरी आजार नसला तरी ती पायाच्या शीरांतील झडपा खराब झाल्याने निर्माण झालेली स्थिती आहे. उत्क्रांतीच्या ओघात चतुष्पाद माकडाचे व्दीपाद माणसात रूपांतर होत गेले. हळुहळु ते मागील दोन पायांवर उभे राहूनच आपला दिवस व्यतीत करू लागले. गुरूत्वाकर्षणाच्या विरूद्ध दिशेने पायातील अशुद्ध रक्त वरती हृदयाकडे जाणे सुलभ व्हावे म्हणून

त्यात वरच्याच दिशेने उघडणाऱ्या झडपा तयार झाल्या. हजारो वर्षांचा काळ जरी उलटला असला तरी या झडपा अजुनतरी म्हणाव्या तितक्या सक्षम झालेल्या नाहीत. अनुवांशिकतेमुळे आलेली शीरांच्या भिंतीतील अवाजवी लवचीकता, सतत उभे राहण्याचा व्यवसाय, पायाच्या स्नायूंची कमी हालचाल, स्थुलता आणि तीही पोटाभोवती एकवटलेली आणि गरोदरपण ही झडपा खराब होण्यामागची प्रमुख प्राथमिक कारणे आहेत. दुय्यम कारणांमध्ये डीप व्हेन थ्रंबॉसीस म्हणजे पायाच्या आतील शीरांमध्ये रक्तगुठळया होणे हे प्रमुख आहे.

या व्याधीची सुरूवात सहसा चोर पावलांनीच होते. दिवसभराचे काम करून संध्याकाळी घरी आल्यावर हात -पाय धुताना ताठरलेल्या शिरां थोडेसे लक्ष वेधून घेतात परंतु दिवसभरच्या ताणामुळे झाले असेल म्हणुन तिकडे दुर्लक्ष केले जाते. हळुहळु ही नित्याचीच बाब होते आणि त्याच्या जोडीला पाय भरून आल्यासारखे वाटणे, पिंढऱ्या दुखणे, कधीकधी रात्री पायात गोळे येणे अशी लक्षणे दिसु लागतात. व्हेरीकोज व्हेन्सच्या पहिल्या स्टेजमधे वरील लक्षणे जरी आढळली तरी पायावर शिरा फुगलेल्या दिसत नाहीत. जसजसे दिवस जातील तसतशा खालील आणखीनच झडपा खराब होत जातात. दुस-या स्टेजमधे फुगलेल्या शिरां जास्तीचे रक्त साठवून घेण्यासाठी आता वेडयावाकडया होतात. तिस-या स्टेजमधे शिरांतील रक्तदाब प्रमाणाबाहेर वाढल्याने घोटयाजवळ सूज येण्यास सुरूवात होते. तसेच रक्तातील लाल रक्तपेशी केशवाहिन्यांतून झिरपून बाहेर पडतात, नष्ट होतात आणि त्यांतील लोह तत्व साठून राहिल्याने त्वचेला काळपट तपकिरी रंग येतो ही झाली चवथी स्टेज. पाचव्या स्टेजमधे कांही वर्षांनंतर घोटयाजवळील त्वचा आणि त्वचेखालील भाग जाड आणि कडक होत जातो . शेवटच्या सहाव्या स्टेज मधे शुद्ध रक्ताच्या कमतरतेमुळे आधीच सुजलेल्या आणि कमकुवत झालेल्या त्वचेवर क्षुल्लक कारणांमुळे जखमा तयार होतात आणि त्या महिनोन् महिने भरत नाहीत. औषधोपचार, मलमपट्टी आणि विश्रांतीने त्या जरी भरल्या तरी वारंवार होत राहतात. या जखमा म्हणजेच व्हेरीकोज अल्सर्स ज्यामुळे पेशंटचे दैनंदिन जीवन अडचणीचे होऊन बसते, कामाचा खोळंबा होतो आणि आर्थिक नुकसानही वारंवार होत राहते. पायावरील अशा मोठाल्या, नागमोडी आणि त्वचेतून दिसणाऱ्या व्हेरीकोज व्हेन्सना ग्रामीण मराठीत ‘नागीण’ या यथार्थ नावाने संबोधले जाते. जिवाला जरी घातक नसली तरी ही नागीण पायाभोवतालच्या विळख्याने त्या व्यक्तिला जणू जखडून ठेवते. तिच्या पाशापासून कायमची सुटका आणि तीसुध्दा ऑपरेशनविना आता लेसर तंत्रज्ञानामुळे शक्य झाली आहे.

आतापर्यंत लहान व्हेन्स साठी स्क्लेरोझंटची इंजेक्शनस्, व्हेन्सचे लहान भाग ऑपरेशनने काढणे आणि मोठया व्हेन्ससाठी परफोरेटर्स बांधणे, लाँग साफिनस व्हेन, स्ट्रीपींग ऑपरेशनने ओढून; सोलून काढणे या उपचार पद्धती वापरात होत्या. ऑपरेशनसाठी दयाव्या लागणाऱ्या भूलेची जोखीम, आत होणारा रक्तस्त्राव, इंजेक्शन नंतर येणारी सूज, बरेच आठवडे घ्यावी लागणारी विश्रांती आणि या सगळ्यांतून पार पडताना होणारा शारीरीक त्रास सहन करूनसुद्धा शेवटी जन्मभरासाठी पायावर खराब दिसणारे उभे आडवे व्रण मागे राहत असत. व्हेरीकोज व्हेन्स पूर्णपणे बंद न होणे आणि त्या परत उद्भवण्याची शक्यताही जास्त असल्याने हे व्हेन स्ट्रीपींग ऑपरेशन करून घेण्यास रूग्ण सहसा तयार होत नसत. ज्यांना फारच त्रास असे ते अगदी नाईलाज म्हणून या चीरफाडीच्या ऑपरेशनला सामोरे जात होते. आता या सर्वांवर मात करण्यासाठी अत्याधुनिक एंडोव्हीनस लेसर उपचार पद्धती कोल्हापूरात उपलब्ध झाली आहे. लेसर्स आणि ऑप्टीकल फायबर या तंत्रांच्या सुंदर मिलाफातून निर्माण झालेल्या या एंडोव्हीनस तंत्राने खराब झालेल्या शिरां ऑपरेशन विना अचूकपणे कायमच्या आतून चोक अप् करता येतात. फक्त अर्धा मिमि जाडीचा लवचिक नाजूक काचतंतू जसे सलाईन लावतात तसा या फुगलेल्या शीरांत सोडला जातो. या काचतंतूच्या टोकांतून लक्ष्यकिरणे बाहेर पडतात. या दशकात शोध लागलेल्या एंडोव्हीनस तंत्रात डायोड लेसर्सच्या ८०८ आणि ९८० या तरंगलांबी वापरल्या गेल्यात. हे लेसर्स प्रथम शिरांतील रक्तात शोषले जाऊन नंतर अप्रत्यक्षरित्या शिरांच्या भिंतींवर परिणाम करतात त्यामुळे त्यांचे काही साईड इफेक्टस् आहेत. लेसर जर प्रत्यक्ष शीरांच्या भिंतीत शोषला गेला तर रक्तात शोषल्यावरचे त्याचे दुष्परिणाम टाळता येतील म्हणून भौतिक शाखेच्या शास्त्रज्ञांनी त्या दृष्टीने प्रयत्न सुरू केले. त्यांच्या संशोधनाची परिणीती म्हणून एन्. डी. याग लेसर मधील १३२० नॅनोमीटर या पूर्णतः नवीन तरंगलांबीचा शोध लागला. लगेचच अमेरिकेतील न्यू स्टार लेसर्सने या १३२० नॅ. मी. तरंगलहरीची लेसर प्रणाली बनविली. शीरांच्या अंतःआवरणातील पेशींमध्ये शोषला जात असलेने आणि शिरांच्या भिंतीपुरतीच त्याची उर्जा सिमीत राहत असल्याने या लेसरचे कांहीही दुष्परिणाम नाहीत. त्यामुळे एन. डी. याग. एंडोव्हीनस लेसर प्रोसिजर नंतर फारसे दुखतही नाही. सकाळी येऊन संध्याकाळी चालत घरी जाता येते. एक दोन दिवसात कामावरही रूजू होता येते. इतक्या सहजतेने हा लेसर व्हेरीकोज व्हेन्स बंद करण्याचे काम करत असल्यामुळे त्याला 'कुल टच' एंडोव्हीनस असे समर्पक नांव दिले आहे. अनेक



वर्षापासून व्हेरीकोज व्हेन्सच्या समस्येने ग्रासलेल्यांना हा ‘कुल टच’ एंडोव्हीनस लेसर उपचार खरोखरच एखादया परीस स्पर्शाप्रमाणे सिद्ध होत आहे. गेल्या सहा वर्षापूर्वी कोल्हापूरातील लक्ष्यकिरण लेसर सेंटरमध्ये आम्ही एंडोव्हीनस उपचारासाठी डायोड लेसर मशीन्स वापरुन सुरु केली. मेडिकल लेसर मधील जे जे कांही नवीन आणि चांगले तंत्रज्ञान आहे ते ते दक्षिण-पश्चिम महाराष्ट्रातील जनतेसाठी उपलब्ध करून देण्याच्या उद्दिष्टाने दहा वर्षापूर्वी स्थापन केलेल्या लक्ष्यकिरण थेराप्युटिक लेसर्स आणि रिसर्च इंन्स्टिटयुटने हे एन. डी. याग तंत्राचे ‘कूल टच्’ एंडोव्हीनस लेसर चार वर्षापूर्वी भारतात प्रथमच आयात करून करवीरच्या शीरपेचात मानाचा आणखीन एक तुराच जणु रोवला आहे. इतकेच नव्हे तर आजतागायत ते या तंत्रज्ञानाची भारतातील एकमेव लेसर माशिन असून त्यावर पंचक्रोशीतील नागरीकांनी व्हेरीकोज व्हेन्सपासून कायमची मुक्तता मिळविली आहे.



